## आज शिक्षक दिन



भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीला अभिवादन आणि शिक्षकांना शुभेच्छा !

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. ५ सप्टेंबर २०२२ ▶ वर्ष : २० वे ▶ अंक : ३३७ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## रोमहर्षक सामन्यात भारताचा पराभव

**दुबई** : दुबईच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळण्यात आलेल्या आशिया चषक स्पर्धेच्या सुपर-४ फेरीतील दुसऱ्या सामन्यात भारताला पाकिस्तानकडून पराभव स्वीकारावा लागला. या सामन्यात नाणेफेक जिंकून पाकिस्तानच्या संघाने भारताला प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिले. त्यानंतर भारताने २० षटकात सात विकेट्स गमावून १८१ धावा केल्या आहेत. प्रत्युत्तरात पाकिस्तानच्या संघानं सहा विकेट्स आणि एक चेंडू राखून भारताचा पाच विकेट्सने पराभव केला.





# सावंतांची शिष्टाई, 'आदिनाथ'मध्ये नवलाई, आबा-दीदी यांच्यात होणार दिलजमाई

**सुराज्य/सोलापूर**

**सोलापूर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात रविवारी नवा धमाका झाला. त्याचा हादरा 'बारामती'लाही बसला. करमाळ्याच्या राजकारणात आणि साखर कारखानदारीत एकमेकांचे कट्टर विरोधक असणारे माजी आमदार नारायण (आबा) पाटील-रश्मी (दीदी) बागल यांच्यात दिलजमाई होण्याचे संकेत आहेत. त्यासाठी राज्याचे आरोग्यमंत्री तथा सोलापूरच्या राजकारणाशी संबंधित असणारे प्रा.तानाजी सावंत यांनी केलेली शिष्टाई फलदायी ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.**



**पुण्यातील बैठकीप्रसंगी मध्यभागी तानाजी सावंत, डावीकडे नारायणआबा पाटील, उजवीकडे रश्मी बागल व आदी मान्यवर**

आदिनाथ सहकारी साखर कारखान्यात यापुढे आबा व दीदींनी एकत्रित काम करण्याची सूचना सावंतांनी रविवारी पुण्यात झालेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीत केल्याचे सांगण्यात येते. आदिनाथसाठी दीदींनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करून शिंदे गटाशी घरोबा केल्याचे मानले जात आहे. बंद स्थितीत असलेल्या आदिनाथसाठी ही एक नवलाई प्राप्त झाल्याने सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

आदिनाथ कारखाना भाडे तत्त्वावर द्यायचाच नाही,असा चंग आबा व दीदींनी बांधलेला होता. सभासदही त्यांच्याच बाजूने होते तरी देखील हा कारखाना बारामतीचे दिग्गज असणारे आमदार रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रोला देण्याचा ठराव केला गेला होता.आदिनाथच्या प्रश्नावरून वरिष्ठ स्तरावर लढाई सुरू आहे.दरम्यान राज्यातील महाविकास आघाडीची सत्ता गडगडल्यानंतर राज्यातील सहकार क्षेत्रातील राजकारणाची चक्रेही फिरू लागली. बारामतीकरांना शह देण्यासाठी आदिनाथ सहकार तत्त्वावर सुरू करण्याच्या हालचाली तातडीने सुरू झाल्या. आदिनाथ कारखाना ओटीएस प्रक्रियेत बसवल्यानंतर सावंत यांनी तातडीने नऊ कोटी रुपये गेल्या आठवड्यात भरूनही टाकले. त्यामुळे आदिनाथ सहकारी तत्त्वावर सुरू करण्याचा मार्ग मोकळा झालाच शिवाय पवार यांचे भाडे तत्त्वावरील मार्ग रोखले गेले.

या साऱ्या पार्श्वभूमीवर रविवारी पुण्यात सावंत यांच्या कार्यालयात आदिनाथच्या संदर्भात एक महत्त्वपूर्ण बैठक झाली. आबांसह दीदी व अनेक मान्यवर त्याला उपस्थित होते. यंदा आदिनाथचा भोंगा वाजवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू असून यंदाचा हंगाम कसा यशस्वी करायचा याविषयी या बैठकीत रणनीती ठरवली गेली,असे सांगण्यात आले. या माहितीला माजी संचालक नवनाथ झोळ यांनी दुजोरा दिला. राज्यात सत्तांतर झाल्यापासून आदिनाथ भाडेतत्त्वावर देण्याचा जो प्लॅन आखला होता,तो हाणून पाडण्यासाठी आबांनी पुढाकार घेतला होता, त्यात त्यांना यश आले. दीदींनी देखील हा कारखाना भाडेतत्त्वावर देण्याच्या निर्णयाविरोधात न्यायालयात धाव घेतली होती. हा कारखाना भाडेतत्त्वावर जाण्यापासून रोखण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व सावंत यांनी त्यांच्या मागे ताकद उभी केली. मोलाची मदत केली. आबांनी कारखाना स्थळावर जाऊन शनिवारी (ता. ३ सप्टेंबर) कारखान्याची पाहणी करून कामकाजही सुरू केले आहे. हंगामाची चर्चा करण्याबरोबरच सावंत यांनी या बैठकीत दोघांमध्ये एकी घडवण्याची पुण्याच्या बैठकीत संधी साधली,असे सांगण्यात येते. आदिनाथचे माजी संचालक नवनाथ झोळ, बाजार समितीचे माजी संचालक देवानंद बागल हे यावेळी उपस्थित होते,असेही सांगण्यात आले. या बैठकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना आबांच्या गटाचे देवानंद बागल म्हणाले की- आदिनाथ बारामती ॲग्रोला भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय झाला होता. मात्र, तीन वर्षे बारामती ॲग्रोने हा कारखाना सुरू केला नाही. हा करार चुकीच्या पध्दतीने झाले असल्याचे लक्षात आल्याने बागल यांनी देखील बारामती ॲग्रोच्या विरोधात न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला. हा कारखाना सहकारी तत्त्वावर सुरू राहावा; म्हणून आपण पाठपुरावा केला यात आम्हाला यश आले.

सध्या कारखाना बागल गटाच्या ताब्यात आहे, त्यामुळे कारखाना सुरू करण्याच्या दृष्टीने आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी बागल आणि आम्हाला बैठकीसाठी बोलावली होते. यावर्षी कोणत्याही परिस्थितीत आदिनाथ कारखान्याचे गाळप झाले पाहिजे, यासाठी सावंत यांच्या उपस्थितीत आमची बैठक झाली. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही आदिनाथ कारखान्याचे कामकाज सुरू होणार आहे, असे देवानंद बागल यांनी स्पष्ट केले.

### एकीचे संकेत

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होण्यापूर्वीच आबांनी यांनी एकनाथ शिंदे गटाला पाठिंबा जाहीर केला होता. मात्र, २०१४ ची विधानसभा निवडणूक शिवसेनेकडून लढवलेल्या दीदींनी अद्यापही आपली भूमिका स्पष्ट केली नव्हती. गेल्या अनेक दिवसांपासून बागल आणि पाटील एकत्र येणार, अशा चर्चा कधी सोशल मीडियातून, तर कधी जनतेमधून ऐकायला मिळत होती. मात्र सावंत यांच्या माध्यमातून हे दोन्ही गट एकत्र येत असल्याचे चित्र दिसत आहे.

## केमजवळ मालगाडी रुळावरून घसरली

**सुराज्य/कुर्डूवाडी**

रस्त्यावरील अपघात झाल्यानंतर वाहने रस्त्यात लगत शेतात येऊन पडल्याचे चित्र आपण अनेकदा पाहिले आहे. मात्र रेल्वे इंजीन शेतात येऊन थांबले सांगितले तर विश्वास बसणार नाही मात्र ही घटना प्रत्यक्षात सोलापूर हद्दीत घडली आहे.

सोलापूर- पुणे रेल्वे मार्गावर केम (ता. करमाळा) येथील दुहेरी रेल्वे ट्रॅक वरील मालगाडीचे रेल्वेचे दोन्ही इंजीन व दोन डबे रेल्वे ट्रॅक सोडून अचानक घसरल्याने रूळ सोडून पेरणी केलेल्या शेतात जाऊन थांबले. यामुळे रेल्वे गाडीची गती किती जोरात होती यांचा अंदाज येतो. ही घटना दि.३ रोजी पहाटे ४ वाजताच्या सुमारास केम





ता करमाळा हद्दीत घडली. या अपघातामुळे काहीवेळ रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली होती. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवित हानी झाली नसून रेल्वेरुळाचे मात्र नुकसान झाले. या अपघाताचे कारण अद्यापही समजू शकले नाही चौकशीनंतर या अपघाताचे कारण स्पष्ट होईल.

सोलापूर- पुणे हा दुहेरी रेल्वे ट्रॅक असून या ट्रॅक वरील एका ट्रॅकवरून जाणारी रेल्वे केमजवळ घसरली व खाली गेली, परंतु रेल्वे विभागाने पहाटे वाजता तातडीने यंत्रणा सज्ज करून क्रेनद्वारे हे रेल्वेचे दोन्ही इंजीन पुन्हा रेल्वे ट्रॅकवर लावून पूर्ववत करण्याचे काम चालू केले. अपघात झालेली रेल्वे लाईन सुरू करण्यास ४ दिवस लागू शकतात. यामुळे ठरावीक गाड्यांच्या वेळेत बदल झाला होता. घटनास्थळी रेल्वे पोलीस बंदोबस्त ठेवला ही घटना पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. रेल्वेचे दुहेरीकरण झाले असल्यामुळे वाहतूक सुरळीत झाली आहे.

मालगाडीच्या अपघाताचे कारण समजू शकले नाही. याबाबत रेल्वेचे कोणतेही अधिकारी कर्मचारी बोलण्यास तयार नाहीत. यामुळे याची अधिक चौकशी करून दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे.



## नवीपेठ येथे जुन्या इमारतीला अचानक लागली आग

**सुराज्य/सोलापूर** : नवीपेठ येथील राजवाडे चौक येथे असलेल्या जुन्या इमारतीला अचानक दुसरा मजल्यावर आग लागल्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली होती,आग लागल्याची माहिती मिळताच



तात्काळ घटनास्थळी चार अग्निशामक दलाची गाडी दाखल झाली. सुमारे तासभर प्रयत्नाने अखेर आग विझवण्यात आली.

आग आटोक्यात आणली असून आगीचे कारण अद्याप समजले नाही, या आगी मध्ये कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही मात्र वित्तहानी झाली असल्याचे सांगण्यात आले.

## शिक्षणाधिकारी राठोड चौकशीच्या फेऱ्यात

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सध्या हे चक्रही जास्त उपयोगी नाहीये !

**सुराज्य/सोलापूर**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाचे तत्कालीन शिक्षणाधिकारी संजयकुमार राठोड यांच्या विरोधात लातूर आणि सोलापूर येथे गुन्हे दाखल असताना पदोन्नती कशी दिली याचा अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षण सहसंचालकांनी झेडपीचे सीईओ दिलीप स्वामी यांना दिले आहेत.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात शिक्षण अधिकारी म्हणून संजयकुमार राठोड हे कार्यरत होते. त्यांच्याविरुद्ध पोलिसात गुन्हे दाखल असतानाही त्यांना पदोन्नती देण्यात आली अशी तक्रार लेबर पार्टीचे साथी बशीर अहमद व विनायक गायकवाड यांनी केली होती. शिक्षणाधिकारी राठोड यांना शासन निर्णयाप्रमाणे केलेल्या तरतुदींनुसार पदोन्नती देण्यात आलेली नाही. त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल असून त्यांनी शासनाची फसवणूक करून पदोन्नती घेतली आहे. त्यामुळे त्यांची पदोन्नती रद्द करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

जिल्हा परिषदेचे दिलीप स्वामी यांच्याशी याबाबत विचारणा केली असता ते म्हणाले की, त्यावेळी माझ्याकडे कुठल्याही प्रकारच्या तक्रारी असल्याचे त्या प्रकरणासंदर्भात आढळून आले नव्हत्या किंवा कोणी तक्रारदारांनी तक्रार त्यावेळी केलेली नव्हती त्यामुळे करण्यास कुठल्या अडचणी दिसून आल्या नसल्याने पदोन्नतीचे प्रकरण आपण शासनाकडे पाठवले होते असे सर्व असताना शासनाकडून याबाबत स्पष्ट अभिप्राय सादर करावा असे आदेश सहसंचालकांनी दिले आहेत. त्यामुळे आता शिक्षणाधिकारी संजयकुमार राठोड यांची पदोन्नती अडचणीच्या फेऱ्यात आल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे.





## विसर्जनाची सेल्फी 'सुराज्य'च्या अंकात...

Go Green with Ecofriendly Ganesh ही मोहीम घराघरात पोहोचली आणि अवघा गणेशोत्सव इकोफ्रेंडली बनला.

लाडक्या बाप्पाचे विसर्जन सुरु होईल ते अनंत चतुर्दशी पर्यंत!

आपल्या घरातील लाडक्या बाप्पाचे घराच्या दारात, अंगणात, टेरेसवर जेव्हा विसर्जन कराल तेव्हा या क्षणाची 'सेल्फी' घ्यायला विसरु नका!

ही सेल्फी सुराज्यला व्हॉटस्अप किंवा इमेलवर पाठवा!

**सोबत आपले नाव आणि पत्ता आवर्जुन द्या...**
**आपला हा सुंदर आठवणीचा सेल्फी सुराज्यच्या अंकात प्रसिद्ध होईल.**

WhatsApp

8975768353 | 8975768352 | 9011466100 | 8888818448
8975768349 | 7775956817

Email : timemarathi@gmail.com